दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक १४७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२० ऑगस्ट २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

गणेशोत्सव गोड करण्यासाठी तब्बल ६० हजार कुटुंबांना अन्नधान्य

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि भारतीय जनता पार्टी पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम

दै.रायगड नगरी । पनवेल

गोरगरिबांच्या सुख दु:खात नेहमी धावून जाणारे दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि भारतीय जनता पार्टी पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवात तब्बल ६० हजार कुटुंबांना गणपती सण गोड करण्यासाठी अन्नधान्य दिला जाणार आहे.

संपूर्ण जग 'कोविड १९' या आजाराशी लढा देत आहे. भारतामध्ये सुद्धा या विषाणूच्या प्रादुर्भावाने हजारो लोक मृत्यूमुखी पडले. कोरोना विषाणू प्रादुर्भाव महामारी आणि लॉकडाऊन परिस्थितीमुळे जगभरात अर्थव्यवस्था बिकट झाली. या परिस्थितीत गोरगरीब हातावर पोट असणाऱ्या नागरिकांवर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि भारतीय जनता पार्टी पनवेलच्या वतीने 'मोदी भोजन' कम्युनिटी कम्युनिटी किचनच्या माध्यमातून हातावर पोट असलेल्या १ लाख २५ हजारहून नागरिकांना भोजन देण्यात आले. त्याचबरोबर ९० हजारहून अधिक नागरिकांना तांदुळ, गोडेतेल, तुरडाळ, कांदे, बटाटी, साखर आदी अन्नधान्य देऊन कोरोनाच्या संकटकाळात आधार देण्यात आलेला. तसेच १ लाखाहून अधिक नागरिकांना मास्क व रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या गोळ्या, सॅनिटायझर अशा अनेक आवश्यक साहित्य देण्यात आले. त्याचबरोबरीने कोरोनाग्रस्त रुग्णांची सेवा तत्पर झाली पाहिजे यासाठी आमदार प्रशांत ठाकूर

व सहकारी कोविड रुग्णालयांशी समन्वय साधून रुग्णांच्या उपचारासाठी जातीने लक्ष घालत आहेत. लॉकडाऊन झाल्यापासून विविध प्रकारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि भारतीय जनता पार्टी पनवेल यांच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांची सेवा करून सर्वोतपरी मदत सुरूच राहिली आणि आजपर्यंतही हा मदतीचा ओघ सुरूच ठेवला आहे. त्याचाच एक भाग म्हणून गणेशोत्सवात ग्रामीण व शहरातील ६० हजार कुटुंबांना साखर, मैदा, तूप, गूळ, चणाडाळ व रवा या धान्याचा एकत्रित पॅकेट देऊन गणपतीचा सण गोड केला जाणार आहे.

एकाही कामगारावर अन्याय झाल्यास टोकाची भूमिका घेऊ : आ.प्रवीण दरेकर

रोह्यातील एल्पे कंपनीवर भाजपची धडक

दै.रायगड नगरी । रोहा

रोहा एमआयडीसीमधील कुठलीही कंपनी आम्हाला बंद करायची नाही, पण येथील एकाही कामगारावर जर अन्याय झाला तर मात्र भारतीय जनता पार्टी स्वस्थ बसणार नाही व आम्ही त्या कामागाराच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभे राहू. अन्यायग्रस्त कामगारांचा प्रश्न सामोपचाराने व चर्चेच्या माध्यमातून सोडविण्याची आमची तयारी आहे, पण व्यवस्थापनाने वा कंपनी प्रशासनाने मुजोरीपणा दाखविली आणि कामगारांवर पुन्हा अन्याय झाला तर मात्र त्या कंपनीविरुध्द न्यायासाठी लढा उभारून आम्ही टोकाची भूमिका घेऊ असा जोरदार इशारा विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रविण दरेकर यांनी आज दिला. यावेळी येथील कंपनीचे कामगार तसेच भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोहा एमआयडीसीमधील एल्पे कंपनीमधील दिनेश भोगटे या कामगारावर अन्याय झाला आहे. कामगारावर झालेल्या अन्यायाविरोधात आज विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्यावतीने मोर्चा काढून कंपनीवर धडक देण्यात आली. कामावरुन काढण्यात आलेल्या कामगाराच्या प्रकरणी त्या कंपनीच्या व्यवस्थापनाला विरोधी पक्ष नेते दरेकर यांनी जाब विचारला. याविषयी कंपनीच्यावतीने संचालिका प्राची बारदेस्कर व एचआर मॅनेजर संजय देशमुख यांनी विरोधी पक्ष नेते दरेकर यांच्याशी सविस्तर चर्चा केली. ही चर्चा सकारत्मक झाली असून येत्या दोन दिवसात यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन कंपनीच्या वतीने देण्यात आल्याची माहिती दरेकर यांनी दिली.

तत्पूर्वी प्रविण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या रायगड जिल्हाच्या वतीने कंपनीवर मोर्चा काढण्यात आला. यावेळी शेकडो कामगारांनी कंपनीच्या गेटवर धडक दिली. यावेळी या मोर्च्याला मार्गदर्शन करताना दरेकर यांनी सांगितले की, भारतीय जनता पार्टी सदैव कामगारांच्या पाठीशी आहे. एल्पे कंपनीच्या प्रशासनाने कागमारांवर विविध प्रकारे अन्याय चालविला आहे. त्यांना वेठबिगाराप्रमाणे वा-गणूक दिली जात असल्याच्या अनेक तक्रारी आपल्याकडे आल्या आहेत. त्यामुळे कंपन्यांची अशी मुजोरी यापुढे खपवून घेतली जाणार नाही. कामगारांना दाबण्याचा व चेपण्याचा प्रयत्न कोणती कंपनी करत असेल व कंपनीने कामगारांवर अन्याय केला तर भारतीय जनता पक्षाची पहिली लाथ त्या कंपनीवर पडली पाहिजे. यासाठी कामगारांच्या बाजूने उभे राहण्याचे आवाहन त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केले.

कामगारांनीही चुकूनही चुकीचे वर्तन करू नका. चांगल्या प्रकारे काम करा. ..../२

दैनिक रायगड नगरी ई-पेपर

दैनिक रायगड नगरी वृत्तपत्र डिजिटल स्वरुपात देखील सुरु झाले असून आता आपण www.raigadnagari.com या वेबसाईट वर जाऊन ई-पेपर वाचू शकता, तर वाट कसली पाहताय! पनवेल तसेच नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील महत्वपूर्ण बातम्यांसाठी आपण रोजच्या रोज भेट द्या आमच्या वेब साईट आणि त्यावरील ई-पेपरला!

राज्यात आजपासून 'लालपरी' धावणार!

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यात आजपासून सर्वसामान्यांच्या एसटीला आंतरजिल्हा प्रवासाची परव-ानगी देण्यात आली आहे. त्यामुळे आता एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात एसटी बसने प्रवास करता येणार आहे. गणेशोत्सवानिमित्त हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिली आहे. यासाठी बस किंवा प्रवाशांना परवानगी किंवा ई-पासची गरज लागणार नाही. लालपरी सुरु झाल्याने लॉकडाऊनमुळे थांबलेला गावगाडा पुन्हा रुळावर येण्यास मदत होणार आहे. एसटी प्रवासादरम्यान प्रवाशांना काही नियम आणि अटींचं पालन करणं गरजेचं आहे.

कोरोना महामारीमुळे लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे २२ मार्चपासून जिल्ह्यांतर्गत एसटी सेवा बंद होती. परंतु, आता जिल्हाबंदी सरकारने उठवली आहे. मात्र, खासगी वाहनांसाठी ई-पास लागू राहणार आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव

टाळण्यासाठी लॉकडाऊन जाहीर झाला. परिणामी एसटी सेवा ठप्प झाली. मुंबई विभागात अत्यावश्यक सेवेच्या कर्मचाऱ्यांसाठी आजही एसटी धावत होती. राज्यातील इतर विभागात देखील एसटीची तुरळक सेवा सुरु होती.

कोरोनाच्या या महामारीत एसटी लॉकडाऊनमुळे आपल्या गावाकडे जाणाऱ्या परप्रांतीय कामगारांसाठी महाराष्ट्राच्या शेवटच्या सीमेपर्यंत धावली. इतकंच नाही तर राजस्थानमधील कोटा येथे अडकलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आणण्यासाठी एसटी थेट कोट्यापर्यंत पोहचली. तिथून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत धावली. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे, लॉकडाऊनमुळे ११३ दिवसाच्या कालावधीत एसटीच्या इतिहासात प्रथमच २३०० कोटींचा महसूल बुडाला.

याआधी परिवहन विभागाने मे महिन्यात आंतरजिल्हा एसटी सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु लोकांच्या मनात जबरदस्त भीती आहे. रेड झोनमधून इतर जिल्ह्यामध्ये माणसं पाठवू नका, कोरोना पसरवू नका, अशा तक्रारी आमच्याकडे आल्या. काही लोकांनी विरोध केला, त्यामुळे आम्ही ताबडतोब आंतरजिल्हा एसटीचा निर्णय स्थगित केला, असं स्पष्टीकरण परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिलं. तसंच आंतरजिल्ह्यात टप्प्याटप्प्याने सेवा सुरु करण्याचा विचार असल्याचंही ते म्हणाले होते.

सावधान... पुढे रस्ता खचतोय!.....

वेळास-आदगाव रस्ता मंजूर मात्र लॉकडाऊनमुळे रखडला

दै.रायगड नगरी । दांडगुरी

श्रीवर्धन तालुक्यातील वेळास – आदगाव मार्गावरील रस्ता खचत जात असल्याचे दिसते. सध्या सततच्या पडणाऱ्या पावसामुळे या खड्ड्यांत दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या हा रास्ता मंजूर झाला असून लॉकडाऊन मुळे सार्वजनिक बांधकाम खात्याकडून काम सुरु झाले नसल्याचे सांगण्यात आले आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन दृष्टीकोनातून प्रमुख असे समुद्रकिनारे विशेषता प्रसिद्धीस आले आहेत. त्यामध्ये श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर, कोंडविल या किनार्यांचा समावेश आहे. त्यातच, वेळास व आदगाव समुद्रकिनारा देखील पर्यटकांच्या विशेष पसंतीचा आहे. कारण या समुद्र किना-याचे वैशिष्ट म्हणजे हा खडकाळ समुद्रकिनारा आहे. खडकावर आपटणाऱ्या सागरलाटा पर्यटकांस

आकर्षित करतात. त्यामुळे पावसाळी पर्यटकांसह स्थानिक रहिवाशांचीही गर्दी या ठिकाणी होते. दिवेआगरहून मुरुड जंजिऱ्याकडे जाताना दिघी रस्त्याला अलिकडेच एक वेळास फाटा येथून दोन कि.मी.वर हा समुद्रकिनारा आहे. लोकडाऊन हळूहळू उठू लागल्याने प्रवाशांची वर्दळ आता वाढत आहे. मात्र, सद्यस्थितीत वेळास – आदगाव या मार्गावर चार मोठे खड्डे पडल्याने हा रस्ता खचण्याची भीती प्रवाशांकडून व्यक्त केली जातेय.

वेळास पासून आदगाव हा मार्ग पूर्ण समुद्र लगत आहे. रस्त्यालगत संरक्षक भिंत आहे मात्र तीही पूर्ण मोडकळीस आली आहे. समुद्राच्या जोरदार क्षारयुक्त लाटांमुळे रस्त्याची आणखी दुर्दशा होत आहे. मुळात खड्डे हे रस्त्यावर ..../२

उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात झाडांची पडझड

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

निसर्ग वादळात उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात मोठाली झाडे उन्मळून कोसळलेली आहेत. आज १६ दिवसांपासून सदरची झाडे जैसे थे स्थितीत पडून राहिली असल्याने तसेच परिसरात गवत घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याने सध्या रुग्णालयाच्या परिसरात सरपटणाऱ्या प्राण्याचा वावर वाढला आहे. तरी उरण नगर पालिकेने ..../२

सिडकोच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पदावर डॉ.संजय मुखर्जी

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

सिडको महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी डॉ. संजय मुखर्जी आज दिनांक १९ ऑगस्ट २०२० रोजी रूजु झाले. त्यांनी मध्यानपूर्व सिडकोच्या मुंबईमधील निर्मल भवन कार्यालयात सिडकोचे पूर्वीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्याकडून सिडको महामंडळाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पदाची सूत्रे स्वीकारली. या प्रसंगी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. प्रशांत नारनवरे, सहव्यवस्थापकीय संचालक श्री. अशोक शिनगारे व मुख्य दक्षता अधिकारी श्री. निसार तांबोली उपस्थित होते. सिडकोच्या सेवेत रुजू

होण्यापूर्वी डॉ. संजय मुखर्जी वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन व सांस्कृतिक कार्य विभागात, सचिव या पदावर कार्यरत होते.

१९९६ च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडर मधील भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी डॉ. संजय मुखर्जी मूळचे नागपूरचे असून त्यांनी नागपूर येथील गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेजमधून (बॅचलर ऑफ सर्जरी) एमबीबीएस, अहमदाबाद येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथून पब्लिक फायनॅन्सवर शॉर्ट टर्म कोर्स, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड फायनॅन्शिअल नालिस्ट ..../२

उरणकरांचे कोविड हॉस्पिटलचे घोंगडे भिजत; सर्व यंत्रणा गप्प

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यात व शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळे कोरोनाग्रस्तावर त्वरित उपचार करण्यासाठी उरणमध्ये कोविड हॉस्पिटल उभारण्याचा प्रयत्न काही दिवसांपासून सुरू आहे. परंतु उरणमध्ये कोविड हॉस्पिटल सुरू व्हावे यासाठी जो उत्साह होता आता तो मावळत जाऊन कोविड हॉस्पिटलचे घोंगडे भिजत राहिले आहे.

गेले ३ ते ४ महिन्यापासून राज्यासह उरणपरिसरात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ लागाला आहे. त्यामुळे रुग्णांवर उपचार करण्यासाठी उरणमध्ये अद्ययावत यंत्रणा नसल्याने रुग्णांना पनवेल, वाशी व मुंबई या ठिकाणी हलवावे लागत होते. या धावपळीमुळे काही रुग्णांचे हाल होऊन त्यांचा उपचारा अभावी मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

उरणमधील कोरोना रुग्णांना त्वरित या ठिकाणीच उपचार मिळावे यासाठी उरणमध्ये कोविड ..../२

शुभ्र काही देखणे

भारतीय शास्त्रीय संगीताचे सुदैव असे की सात स्वरांमधून स्वर्गीय आविष्काराच्या अगणित शक्यता प्रत्यक्षात आणणारे हजारो साधक या मातीत जन्माला आले. या साधकांना लाखो रसिकांनी देवत्व बहाल केले आणि स्वरांच्या या ईश्वरांनीही त्या देवत्वाची बूज राखत आपले आयुष्य संगीतचरणी अर्पण केले. स्वरांमध्ये प्रत्यक्ष परमेश्वराशी संवाद साधण्याची ताकद आहे असे म्हटले जाते, त्याचा मानसिक पातळीवर प्रत्यय आणून देणारे जे महान गायक गेल्या शतकभरात झाले, त्यात पंडित जसराज यांचे नाव घ्यावे लागेल. भारतीय शास्त्रीय संगीताला तरुण पिढीचा आश्रय नाही, अशा तक्रारी केल्या जातात, अशा निराशावादाला पं. जसराज यांनी कधीच थारा दिला नाही. 'वो जमाना अच्छा था' हे वाक्यच मला आवडत नाही, असे ते म्हणत. नव्वदाव्या वर्षी पंडितजींनी अखेरचा श्वास घेतला, तेव्हा तरुण पिढी 'बंदिश बँडिट्स' मधले 'ए री सखी मैं, अंग अंग आज रंग डारू' हे शास्त्रीय संगीतावर आधारलेले विरहगीत आवडीने ऐकते आहे, हा योगायोग पंडितजींच्या आध्यात्मिक वृत्तीला साजेसाच आहे. स्वरांच्या जादूने पंडितजींना बालपणीच मोहून टाकले. पुढे त्यांनी शास्त्रीय संगीतातील विरह, प्रेमाच्या भावनांना भक्तीचा नवा रंग देऊन स्वतःच शैली प्रस्थापित केली. शास्त्रीय संगीताच्या काही रूढ चौकटी मोडत, प्रयोगांचे धाडस दाखवत त्यांनी हा प्रवास केला. मात्र, आपल्या कर्तृत्वाने आधी त्यांनी तसा अधिकार प्राप्त केला होता. चांगला गायक, चांगला रसिक व्हायचे असेल तर 'तुमच्या कानांना डोळे असायला हवेत' असे पंडितजी सांगत, त्याला ते कर्णचक्षू असे संबोधत. त्यांना स्वतःला असे 'कर्णचक्षू' खूप लवकर प्राप्त झाले होते. पंडितजी आठ, नऊ वर्षाचे असताना, शाळेतून घरी जात असताना त्यांनी बेगम अख्तर यांचे गाणे ऐकले. त्या आवाजाने त्यांना झपाटून टाकले. 'दिवाना बनाना है तो दिवाना बना दे..' ही ती गझल. त्यांना त्या गझलेतले वेगळेपण लक्षात आले. त्यांनी बेगमच्या इतरही गझल, ठुमऱ्या ऐकल्या आणि पंडितजींच्या मनात ठुमरी हा प्रकार रुतून बसला होता, ते काही काळ ठुमरी गातही होते. परंतु एकदा त्यांचा उल्लेख 'लाइट क्लासिकल सिंगर' असा केला गेला आणि त्यांनी मग केवळ शास्त्रीय संगीताला वाहून घेतले. अशा प्रकारे एखादी घटना घडावी, पंडितजींनी काही निर्धार करावा, असे त्यांच्या आयुष्यात वारंवार घडले. आधी ते तबला वाजवायचे, आपले मोठे बंधू पं. प्रताप नारायण यांना साथही करत. एका कार्यक्रमासाठी ते बंधूंसोबत गेले असताना, तिथे पं. कुमार गंधर्वही होते. त्यांना 'आकाशवाणी'वर गायचे होते, तबल्यावर साथ द्यायला ते जसराज यांना घेऊन गेले. दुसऱ्या दिवशी पं. अमरनाथ चावला जसराजना म्हणाले, काल कुमार गंधर्वांनी 'भीमपलास'मध्ये धैवत वापरला, ते चूक होते, तू त्यांना थांबवायला हवे होते. जसराज म्हणाले, भीमपलासमध्ये धैवताचा वापर हा प्रयोग होता, त्यासाठी धाडस पाहिजे. त्यावर अमरनाथांनी, 'तुम तो मरा हुवा चमडा पिटते हो, तुम्हे गाना नही आता..' असा टोमणा मारला. त्या एका वाक्यामुळे जसराजांच्या मनात गाणे शिरले. पुढे काही प्रसंगांनी त्याचे निर्धारात रूपांतर केले. हीच प्रयोगशीलता त्यांनी कायम जोपासली. 'बिना चोट लगे रास्ता नही निकलता' या सिद्धान्तावर विश्वास ठेवत त्यांनी आलेला प्रत्येक अनुभव पचवला आणि शास्त्रीय संगीतात स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले. साक्षात बडे गुलाम अली खाँ यांनी त्यांना आपला शिष्य म्हणून स्वीकारले होते. परंतु जसराजांनी आपल्या मेवाती घराण्याची तालीम घेणेच पसंत केले. मेवाती घराण्याचे गायक म्हणूनच त्यांनी ख्याती प्राप्त केली. परंतु, घराण्यांच्या भयाचा अडथळा त्यांनी होऊ दिला नाही. भजनांच्या बंदिशी रचून, काही भजनांना बंदिशींचे रूप देऊन त्यांनी शास्त्रीय संगीताला अध्यात्माचे, भक्तीचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. 'मेरो अल्लाह मेहरबान' ही बंदिश गाता गाता एकदा त्यांच्या तोंडून 'अल्लाह मेहरबान ओम' असे शब्द बाहेर पडले आणि अध्यात्म-धर्माच्या पलीकडे अर्थ प्राप्त झाला असे त्यांना वाटले. त्यांच्या गाण्याची ती ताकद होती. साक्षात भगवान श्रीकृष्ण स्वप्नात येतात, उपदेश करतात, असे ते म्हणत याचा अर्थही त्यांच्या स्वप्नातही ते गात असतात असा घ्यावा लागतो. एक किस्सा पंडितजी बरेचदा सांगत. एकदा एका आडगावी त्यांचे गाणे होते. आयोजक म्हणाले, 'तीन वर्षे पाऊस नाही. तुम्ही मेघ मल्हारातून प्रार्थना करा. पण त्यामुळे पाऊल पडेल असे नाही,' पंडितजी चार तास गायले आणि रात्री खरोखरच पाऊस पडला. हा किस्सा सांगून एक पॉझ घेऊन पंडितजी पुढे सांगत, मी मेघमल्हार गायलो आणि त्यानंतर पाऊस वगैरे काही पडला असे मात्र अनेकदा झाले. त्यांचे अध्यात्म असे डोळस होते. त्यांच्या गाण्यांत असलेला मोकळेपणा हा अशा स्वभावातून आला होता. पिली मंधोरी हे हरियाणात फतेहबाद जिल्ह्यातील छोटेसे गाव. सात-आठ वर्षाचा 'जस' स्वरांच्य सहवासात तिथे जन्माला आला आणि त्या स्वरांना त्याने विश्वव्यापी प्रतिष्ठा मिळवून दिली. सर्व प्रकारचे सत्कार, पुरस्कार, सन्मान त्यांच्या वाट्याला आले. मानेवर रुळणारे शुभ्र भुरभुरते केस, सोनेरी काठाचा सिल्कचा झब्बा, तोही अनेकदा शुभ्रच. डोळे मिटताच श्रोत्यांच्या कानी पडणारा तसाच शुभ्र, शुद्ध पवित्र स्वराविष्कार. जेव्हा कधी आपण त्यांचे गाणे ऐकू तेव्हा 'शुभ्र काही देखणे' म्हणावे असे पंडितजींचे रूप डोळ्यांपुढे येत राहील.

माणगाव तालुक्यात आणखी १० नवे कोरोनाग्रस्त सातत्याने रुग्ण वाढत चालल्याने सारेजण चिंताग्रस्त

दै.रायगड नगरी । माणगाव

संपूर्ण जगभरात धुमाकूळ घालणाऱ्या कोरोना महामारीचा संसर्ग रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातही वाढला असून याठिकाणी लॉकडाऊनच्या चौथ्या टप्प्यापासून सातत्याने कोरोनाचे रुग्ण आढळत असल्याने प्रशासनाबरोबरच नागरिक हतबल होऊन चिंताग्रस्त बनले आहेत. सोमवार दि.१७ ऑगस्टला तालुक्यात एकाच दिवशी २४ रुग्णांचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आला असून पाठोपाठ मंगळवार दि.१८ ऑगस्टला तालुक्यातील माणगाव नगरपंचायत हद्दीतील ३ रुग्ण, इंदापूर गावांतील ३ रुग्ण व वारक, देगाव, विघवली, मांगरुळ- लोणेरे या गावांतून प्रत्येकी एक रुग्ण अशा एकूण १० रुग्णांचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आल्याची माहिती माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रदीप इंगोले यांनी प्रसार माध्यमांना दिली.

माणगाव तालुक्यात लॉकडाऊनच्या चौथ्या टप्प्यापासून सातत्याने कोरोना रुग्ण आढळत आहेत. तालुक्यात कोरोनाचे रुग्ण बरे होण्याचे प्रमाण चांगले असले तरी वरवर कोरोनाचे रुग्ण सापडत असल्याने याची सर्वांनी धास्ती घेतली आहे. माणगाव तालुक्यातील नागरिकांनी कोरोनावर मात करण्यासाठी सरकारने केलेल्या मार्गदर्शनपर सूचना याकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देवून मास्क, सॅनीटायझर याचा वेळोवेळी वापर करून स्वच्छतेच्या दृष्टीने अधिक सतर्क राहून विशेषकरून कोणी गर्दी करू नका, गर्दीतून या महामारीचा संसर्ग जलदगतीने होत असल्याने सर्वांनी सूचनांकडे लक्ष देवून आपण सामुदायिक प्रयत्नांतून माणगाव तालुका लवकरात लवकर कोरोनामुक्त करण्याचा प्रयत्न करू असे आवाहन तालुक्याच्या प्रांताधिकारी श्रीमती प्रशाली जाधव दिघावकर यांनी केले आहे.

शिवसेना व युवासैनिकांनी सिडकोचा पाठपुरावा करून घेतली रस्त्यांची दुरूस्ती

दै.रायगड नगरी । पनवेल

खारघर वसाहतीत सेक्टर ३, बेलपाडा इथे रस्त्याची वाताहात झाली होती. याबाबत स्थानिक रहिवाशांनी शिवसेनेकडे तक्रार करताच शिवसेना व युवासैनिकांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून प्रत्यक्ष रस्ता दुरूस्तीच्या कामाला सुरवात केली आहे.

या रस्त्यांना पडलेल्या खड्ड्यांमुळे खारघरवासीयांचे हाल होत आहेत. यासंदर्भात शिवसेना विभाग प्रमुख उत्तम मोर्बेकर, माजी.उपशहर अधिकारी युव-ासेना नरेश ढाळे, संतोष माळगवकर, समाजसेवक अटवकर यांनी संबंधीत सिडको अधिकाऱ्यांना भेटून खारघर वासीयांच्या समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या आणि रस्ताची दुरूस्ती त्वरीत करण्यात यावी अशी मागणी केली असता या मागणीची दखल घेत सिडकोने रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामाला सुरवात केल्याने स्थानिक रहिवाशांनी शिवसेना व युवासेनेचे आभार मानले आहेत.

मुरुड, अगरदांडा परिसरात उपलब्ध जेट्टीवर तातपुर्ती तातडीने सुविधा देऊन, कायमस्वरूपी मत्स्यजेट्टी उभारणीसाठी प्रस्ताव करा : ना.दत्ता भरणे

खा.सुनील तटकरे यांच्या प्रयत्नाला मिळाले यश

दै.रायगड नगरी । आगरदांडा

आगरदांडा बंदरात मच्छिमारांना मासळी विकण्यासाठी जेट्टी मिळावी या आपल्या प्रमुख मागणीसाठी राजपुरी दिघी एकदरा व मुरुड परिसरातील सर्व नाखवा मंडळी एकत्र येत मुरुड तालुका नाखवा संघाचे मुख्य समनव्यक प्रकाश सरपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोठे सागरी आंदोलन करून शासनाचे लक्ष्य वेधले होते कोरोना च्या पार्श्वभूमीवर मुंबई येथील मासळीची मोठे मार्केट बंद असल्याने मच्छिमारांना आपली मासळी विकता येत नव्हती त्यामुळे आम्हाला आगारदांडा बंदरात तातडीने तात्पुरत्या स्वरूपात नवीन जेट्टी बांधून मिळावी ही आंदोलन कर्त्यांची प्रमुख मागणी होती त्या अनुषंगाने मोठे सागरी आंदोलन झाले होते.

या आंदोलनाची दखल रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी घेतली होती मच्छिमारांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी मत्स्यविकास राज्यमंत्री दत्ता भरणे यांच्या दालनात नुकतीच सर्व अधिकाऱ्यांसमवेत सभा आयोजीत केली होती. रायगड जिल्ह्यात मुरुड, आगरदांडा परिसरात कायमस्वरूपी मत्स्य जेट्टी उभारणीसाठी प्रस्थाव तयार करावा, तसेच मेरिटाईम बोर्ड यांची सध्या उपलब्ध जेट्टींची पाहणी करून योग्य ठिकाणी मत्स्यव्यवसायासंबंधी सुविधा उपलब्ध कराव्यात, असे निर्देश मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंत्रालयत झापन्न झालेल्या सभेत अधिकारी वर्गाना दिले. सदरील बैठकीस रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, मत्स्यव्यवसाय आयुक्त अतुल पाटणे यांच्यासह महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डचे अधिकारी तसेच मच्छीमार संघटनेचे प्रकाश सरपाटील, लक्ष्मण मेंदडकर, चेरमन महेंद्र गार्डी, व्हाईस चेरमन धुर्वा लोदी उपस्थित होते.

सध्याच्या कोविड परिस्थितीमुळे मच्छीमारांना समुद्रात मासेमारी करून आणल्यानंतर मासे विक्रीसाठी तसेच मत्स्यप्रक्रियेसाठी ससून डॉक येथे जाता येत नाही व स्थानिक माच्छिमारांनी आपल्या गावी व्यावसाय करण्याचा स्वगतार्ह निर्णय घेतला असल्यामुळे मच्छीमारांना आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागु नये म्हणुन त्यांची पर्यायी व्यवस्था व्हावी अशी मागणी मच्छीमार संघटनांनी राज्यमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे विनंती केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी या बैठकीचे आयोजन केले. . भरणे यावेळी म्हणाले की, सध्याच्या कोरोना परिस्थितीत सोशल डिस्टंसिंग आणि स्वच्छता राखणे महत्वाचे असल्याने अगरदांडा येथे संध्या आस्थितावात असलेल्या प्रवासी जेट्टीवर तातपुर्ती प्लोटींग पध्दतीने सुविधेचा मार्ग काढुन. मुरुड-आगरदांडा परिसरात सोयीस्कर जागी कायमस्वरूपी जेट्टी उभारणीचा प्रस्ताव तयार करण्यात यावा. मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी आणि मेरिटाईम बोर्डाचे अधिकारी यांनी तातडीने संयुक्त पाहणी दौरा करून कायमस्वरूपी मत्स्यजेट्टी उभारणीसाठी जागा निश्चित करून तसा प्रस्ताव पाठवावा. तोपर्यत तात्पुरती व्यवस्था म्हणून सध्या अस्तित्वात असलेल्या जेट्टींची पाहणी करून तेथे मासे उतरवण्याची तसेच विक्री व त्या अनुषंगाने अन्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करा, असे निर्देशही राज्यमंत्री भरणे यांनी दिले.

मच्छिमारांची बाजू मांडताना रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी आगरदांडा येथे जेट्टी का असावी याचे महत्व पटवून सांगताना शिवकालीन दाखले देत पारंपरिक पद्धतिने मच्छिमार मासळी पकडत असून या ठिकाणी जेट्टी खूप आवश्यक असल्याचे मत नोंदवले या परिसरात पारंपरिक मच्छिमार टिकवून राहावा यासाठी त्यांना सुविधा देणे व सहकार्य करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. यावेळी नाखवा संघटनेचे अध्यक्ष प्रकाश सरपाटील यांनी आगरदांडा येथे मच्छिमारांना जेट्टी मिळावी यासाठी रायगडच्या खासदार सुनील तटकरे यांनी बहुमूल्य सहकार्य केल्याबद्दल आभार व्यक्त केले.

निसर्ग चक्रीवादळ नुकसान भरपाई व कोरोनाच्या पार्शवभूमीवर आ.अनिकेत तटकरेनीं घेतली आढावा बैठक

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

निसर्ग चक्रीवादळात श्रीवर्धन तालुक्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले .पालकमंत्री अदितीताई तटकरे, खासदार तटकरे साहेब व स्वतः आमदार अनिकेतभाईंनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून जुने निकष बदलून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत वाढवून घेतली. नुकसान भरपाई पंचनामे दाखल झालेल्याना तात्काळ मिळावी यासाठी प्रयत्न केल्याने बहुतांशी लाभार्थ्यांना रक्कम त्यांच्या खात्यात जमा झाली .तांत्रिक अडचणींमुळे काही लाभार्थ्यानाच्या खात्यात रक्कम जमा झाली नाही. यासाठी व कोरोना रोगाच्या पार्शवभूमीवर आमदार अनिकेत भाई तटकरे यांनी प्रशासकीय भवन श्रीवर्धन येथे आढावा बैठक घेतली.

काही लाभार्त्यांना नुकसान भरपाई अद्याप मिळाली नसल्याने अशा लाभार्थ्यांनी आमदार अनिकेतभाईंना विनंती केल्याने ते स्वतः जातीने उपस्थित होते. आढावा बैठकीत आमदार अनिकेतभाई जनतेसाठी असलेली तळमळ वेळोवेळी पाहावयाला मिळाते. बैठकीत जनतेच्या तक्रारी ऐकून घेत अधिकाऱ्यांना सूचना देत कामांचा वेग वाढवण्याच्या सूचना दिल्या. पंचनामे दाखल होऊन संबधीतांच्या खात्यात रक्कम का जमा होत नाही याची चौकशी केली. तसेच बँकेचे मॅनेजर यांच्याकडे चौकशी केली. पंचनाम्यात आधारकार्ड नावात साधर्म्य, चुकीचे नाव खाते नंबर चुकीचे अशा तांत्रिक चुका येत असल्याने उर्वरित लाभार्थ्यांना रक्कम मिळण्यास विलंब होत असल्याचे लक्षात आले. तांत्रिक चुका लवकरात लवकर दुरुस्त करून उर्वरित लाभार्थ्यांना रक्कम देण्याच्या सूचना या वेळी आमदार अनिकेत तटकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. कोरोनाच्या पार्शवभूमीवर केलेल्या उपाय योजना तसेच सध्याची स्थिती याबाबत माहिती घेऊन उपजिल्हा रुग्णालयाला पालकमंत्री अदितीताई तटकरे यांच्या आमदार फंडातून सुसज्ज एम्बुलंस येत्या ३/४ दिवसात देणार असल्याचे जाहीर केले. २दिवसांवर येणाऱ्या गणेशोत्सवासाठी येणाऱ्या चाकरमानी तसेच रस्ते, पाणी, वीज याबाबत प्रशासनाने तयारी कशा प्रकारे केलेय याची माहिती घेऊन संबंधितांना कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू न देता शासकीय नियमानुसार जनतेला गणेशोत्सव आनंदात साजरा करता यावा यासाठी सूचना केल्या. आढावा बैठकीत उपविभागीय अधिकारी अमित शेडगे, तहसीलदार सचिन गोसावी, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ पांडे उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ मधुकर ढवळे, नगराध्यक्ष जितेंद्र सायनाक, सां.बा.चे कार्यकारी अभियंता गणगणे, गटविकास आधिकारी सिंणारे, वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता महेंद्र वाकपैंजण तसेच विविध खात्याचे अधिकारी उपिस्थत होते.

रायगड जिल्हा नाभिक तरुण संघ निवडणूक चुरशीची ; सुदाम शिंदे एकमताने विजयी

दै.रायगड नगरी । म्हसळा

रायगड जिल्हा नाभिक तरुण संघाची अध्यक्ष पदाची पंचवार्षिक निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी दत्तात्रेय पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १७ ऑगस्ट २०२० रोजी माणगाव येथे संपन्न झाली. या पंचवार्षिक निवडणुकीसाठी एकूण ५ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले होते,परंतु ऐनवेळी एका उमेदवाराने आपला अर्ज मागे घेतल्याने निवडणूक रिंगणात चार उमेदवार राहिले.एकापेक्षा अधिक उमेदवार रिंगणात असल्याने निवडणूक घेणे अनिवार्य ठरले. जिल्हा विश्वस्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी दत्तात्रेयभाऊ स.पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या निवडणुकीत गोरेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते सुदाम बाबू शिंदे यांची एकमताने निवड झाल्याचे दत्त-ात्रेय पांडे यांनी जाहीर केले. नवनिर्वाचित अध्यक्ष सुदाम शिंदे हे अतिशय शांत आणि मनमिळवू स्वभावाचे असल्याने त्यांना समाजसेवेची खूप आवड आहे. गेली अनेक वर्षे ते नाभिक समाज संघटनेत कार्यरत आहेत.त्यांनी जिल्हा नाभिक संघटनेचे सदस्य, महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी, जिल्हा सचिव या आणि इतर पदांवर जबाबदारिपूर्वक काम केले असून त्यांचा नावलौकिक आहे.

निवड जाहीर होताच सुदाम शिंदे यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले. अध्यक्ष पदाच्या माध्यमातून समाजाची सेवा आणि अडीअडचणी सोडविण्याचे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले. सर्वाना सोबत घेऊन आणि सर्वांच्या सहकार्याने समाजाचे कार्य करण्याचे आश्वासनही सुदाम शिंदे यांनी दिले. सर्व समाजबांधवांनी सुदाम शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करून सर्वोत्तपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

टोकाची भूमिका घेऊ : आ.प्रवीण दरेकर

कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मेक इन इंडियाचे धोरण आहे. त्यामुळे आपल्या चुकीच्या वतर्नानाने चांगले कारखाने बंद पडणार नाहीत याची दक्षता घ्या. कारण कामगार टिकला तर मेक इंडिया यशस्वी होऊ शकतो, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

कंपनीतून काढून टाकलेल्या कामगाराच्या वाचा फोडण्यासाठी काढण्यात आलेल्या मोर्च्यामध्ये आमदार रवीशेठ पाटील, भाजपचे रायगडचे जिल्हाध्यक्ष ॲड.महेश मोहिते, भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष अमित घाग, वैकुंठ पाटील, राजेश मापारा, तालुकाध्यक्ष सोपान जांबेकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

रस्ता मंजूर मात्र लॉकडाऊनमुळे रखडला

आहेत. जोरदार पावसात हा रस्ता पूर्ण पडण्याची भीती आहे. वेळीच दुरुस्ती झाली नाही तर वेळास व आदगाव या दोन्ही गावांचा संपर्क तुटू शकतो. आदगाव जाणाऱ्या मार्गातून प्रवास करतेवेळी वाहन चालकाला रस्त्याच्या बाजूला मोठा खड्डा पाच ते सहा फुट खोल असताना त्याच खड्ड्याच्या बाजूला रस्त्याच्या कडेवरून भीतिदायक प्रवास करण्याची वेळ आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने लवकरच काम सुरु करावा अशी मागणी वाहनचालक करत आहेत.

सागरी मार्ग म्हटल्यावर समुद्राची भरती ओहोटी लाटांचा मारा ह्या गोष्टी लक्षात घेतल्यास रस्त्याची वारंवार करावी लागणारी देखभाल न झाल्याने वेळास आदगाव रस्ता पूर्ण पणे खचला आहे. मुख्य जिल्हा मार्ग असल्याने रस्त्याच्या देखरेखीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम खात्यावर आहे.

ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात झाडांची पडझड

सदर परिसराची स्वच्छता करण्यासाठी व उन्मळून पडलेली झाडे हटविण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी रुग्णालयात ये-जा करणारे रुग्ण,त्यांचे नातेवाईक, कर्मचारी करत आहेत.

३ ते ४ ऑगस्ट रोजी उरण तालुक्यात आलेल्या निसर्ग वादळात अनेक गावांत मोठं मोठाली झाडे उन्मळून पडून घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या निसर्ग वादळाचा तडाखा बसलेल्या गावातील झाडे झुडुपे हटविण्यासाठी प्रशासनाने युध्द पातळीवर काम हाती घेतले आहे.मात्र उरणकरांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या उरण शहरातील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात निसर्ग वादळाच्या तडाख्यात कोसळलेली झाडे आज ही गेली १६ दिवसांनंतर ही जैसे थे स्थितीत पडून राहिली आहेत. त्यामुळे रुग्णालयाच्या परिसरात झाडांची पडझड, त्यात पावसाळ्यात वाढणारे गवत, घाणीचे साम्राज्य यामुळे सध्या या रुग्णालयाचा ताबा हा सरपटणाऱ्या प्राण्यानी घेतला आहे. तरी सदर झाडे हटविण्यासाठी व परिसराची स्वच्छता करण्यासाठी उरण नगर पालिकेने पुढाकार घ्यावा अशी मागणी उरणकर करीत आहेत.

संतोष माळी मुख्य अधिकारी - उरण नगर पालिका, निसर्ग वादळाच्या तडाख्यात शहरातील रस्त्यांवर,महत्वाच्या ठिकाणावरील पडलेली झाडे हटविण्याचे काम या अगोदर हाती घेतले आहे. इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात कोसळलेली झाडे हटविण्यासाठी आम्ही लक्ष केंद्रित करणार आहोत.

व्यवस्थापकीय संचालक पदावर डॉ.संजय मुखर्जी

ऑफ इंडिया येथून फायनॅन्स विषयात चार्टर्ड फायनॅन्शिअल नालिस्ट व टोरॅन्टो विद्यापीठातून पब्लिक मिनीस्ट्रेशन व फायनॅन्स विषयावर पदवी संपादन केल्या आहेत. डॉ. संजय मुखर्जी यांनी यापूर्वी मुंबई महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प), राज्य उत्प-ादन शुल्क विभागात आयुक्त, महाराष्ट्र एयरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी येथे सहव्यवस्थापकीय संचालक, जळगाव महानगरपालिकेत आयुक्त तर नागपूर महानगरपालिका येथे अतिरिक्त आयुक्त म्हणून त्यांनी यशस्वीपणे कार्यभार सांभाळला आहे.

उरणकरांचे कोविड हॉस्पिटलचे घोंगडे भिजत

हॉस्पिटल सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. यासाठी शासकीय यंत्रणा, डॉक्टर मंडळी, सामाजिक संघटना व काही हितचिंतकांनी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू केले. त्यामुळे उरणकरांचे कोविड हॉस्पिटलचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल असे वाटत होते. उरणकर कोविड हॉस्पिटल सुरू होण्याची वाट पहात आहे.

आता काही दिवसांवर गणेशोत्सव, नवरात्र, दसरा व दिवाळी सारखे महत्वाचे सण एकामागोमाग येणार आहेत. त्यापूर्वी जर कोरोना हॉस्पिटलची उभारणी केली नाही तर कोरोनाचा प्रादुर्भाव वाढून उपचाराअभावी जर बळींचा आकडा वाढत गेला तर त्याची सर्वस्वी जबादारी प्रशासन यंत्रणेचीच राहील अशी चर्चा उरणच्या नागरिकांत सुरू आहे.

कोविड हॉस्पिटल सुरू करण्यासाठी सुरुवातीला जोरदार प्रयत्न झाले होते. त्यानंतर आज जवळ जवळ महिना होण्यास येऊनही कोविड हॉस्पिटल उरणमध्ये सुरू करण्याच्या हालचाली मंदावल्या असल्याचे दिसून येते. तसेच याबाबत आता कोणी पाठपुरावा करताना दिसत नाही. त्यामुळे उरणकरांचे कोविड हॉस्पिटलचे भिजत असलेले घोंगडे कधी पूर्णत्वास जाईल याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे. अन्यथा कोरोना रुगणांना उपचारासाठी पनवेल, वाशी व मुबंई या ठिकाणी नेण्याशिवाय पर्याय असणार नाही.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

पर्यावरण पूरक विकास कामे करताना रहदारीचे रस्ते अरुंद नकोत : नागरिकांची मागणी

या रस्त्याच्या चढाची तीव्रता कमी करावी यासाठी २०१० पासुन एमएमआरडीएच्या अभियंत्यांबरोबर पाठपुरावा करत होतो. त्यासाठी एस्टीमेटमधे बदल करायला आम्ही भाग पाडले. अमनलॉज रेल्वेरुळ ओलांडल्यावर माथेरानकडे जाणार्या रस्त्याला जो उतार होता त्याचे रुपांतर भरणी करुन चढामधे करावे व हा चढ सखाराम तुकाराम पॉईंटच्या अगोदर शंभर मीटरवर मिळवावा जेणेकरुन यामार्गावरील ज्या अवघड वळणावर तीव्र चढ आहे ज्यामुळे हातरिक्षाचालकांना व माल वाहतुकीच्या हातगाडी ओढणार्या माणसांचे हाल कमी होतील. आणि त्यांचे कष्ट बर्यापैकी कमी होतील. तसेच जे पर्यटक रस्त्याने चालत माथेरान शहरात जातात त्यांचाही प्रवास सुखकर होईल. जर या वळणावरील चढाची तीव्रता कमी झाली नाही तर पंचेचाळीस कोटी रुपयांच्या खर्चाचे मोल काय? जर एमएमआरडीएच्या अभियंत्यांनी याबाबत सकारात्मक पाऊल उचलले नाही तर वरीष्ठांकडे सर्व कामांच्या चौकशीची मागणी करु. न्याय नाही मिळाला तर आंदोलन उभारले जाईल.

मनोज खेडकर, माजी नगराध्यक्ष माथेरान

दै.रायगड नगरी । माथेरान

मागील काळात २०१३ मध्ये एमएमआरडीए मार्फत जवळपास १२३ कोटी रुपयांचा भरीव निधी माथेरानच्या विकास कामांसाठी उपलब्ध झाला होता त्याची प्रत्यक्षात कामे यावेळी सुरू करण्यात आली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी पुन्हा प्राप्त होणे ही अशक्यप्राय बाब आहे. त्यामुळे होत असलेली कामे सुयोग्य पध्दतीने निदान वीस,पंचवीस वर्षे तरी टिकतील अशा स्वरूपाची असावीत त्याचप्रमाणे पर्यावरण पूरक विकास कामे करताना रहदारीला अडथळा नको. जो पूर्वापार रहदारीचा मुळ रस्ता आहे तो सुध्दा कमी करून केवळ काळ्या दगडात ग्याबियन वॉल बांधण्याच्या नावाखाली रस्ते अरुंद केले जात आहेत. सुरक्षेसाठी जरूर नियमाप्रमाणे या वॉल पूर्ण कराव्यात परंतु होत असणाऱ्या अरुंद रस्त्यामुळे आगामी काळात घोडेस्वार तसेच श्रमिक हातरीक्षाचालकांची त्रेधातिरपीट होऊ नये यासाठी जबाबदार लोकप्रतिनिधीनी आपले लक्ष या विकास कामावर केंद्रित करून खऱ्या अर्थाने विकासास हातभार लावावा अशी श्रमिक हातरिक्षा संघटनेसह स्थानिकांकडून मागणी केली जात आहे.

आजही अमन लॉज स्टेशन जवळील काळोखी हा सर्वात अवघड चढ कमी करण्यात आलेला नाही. त्यामुळेच जी युवा मंडळी हातगाडीवर कामे करीत आहेत त्यांना ही अतिकष्टदायक कामे करताना खूपच जिकिरीचे बनले आहे. परंतु लॉक डाऊन मध्ये हाताला रोजगार उपलब्ध नसल्याने ही युवा पिढी नाईलाजाने कुटुंबाला आधार देण्यासाठी रक्ताचे पाणी करून आपले संघर्षमय जीवन जगत आहेत.

एमएमआरडीए मार्फत होणाऱ्या विकास कामांवर जबाबदार लोकप्रतिनिधीनी लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. एकीकडे पर्यावरण पूरक कामे मार्गी लावण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असा आव आणला जातो. लवकरच इथे ई रिक्षा कार्यान्वित होणार आहे त्यामुळे ही रिक्षा अति चढावावर चालू शकत नाही. काळोखीचा चढ खूपच उंच आहे त्याची उंची कमी केल्याशिवाय श्रमिक हातरीक्षा चालकांना सुध्दा आपला व्यवसाय अगदी सहजपणे करता येणार नाही.

ज्यावेळी होत असलेल्या तकलादू कामांच्या बाबतीत इत्यंभूत माहिती जनतेसमोर मीडियाच्या माध्यमातून आणली जाते त्यावेळेस जणू एमएमआरडीएच्या काही प्रमाणात तकलादू कामांची बाजू मांडण्यासाठी येथील काही अभ्यासू मंडळीनी वकीलपत्र घेतल्याप्रमाणे सोशल मीडियावर सारवासारव करीत आहेत ,तर आम्ही चांगल्या दर्जाचे काम पूर्ण करून घेण्यासाठी कटिबद्ध आहोत, आम्ही पत्रव्यवहार केला आहे असे नेहमीच सोशल मीडियावर जबाबदार व्यक्तींकडून पहावयास मिळते.

रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांनी मानले शिवसेना व डॉ. सुहास हळदीपूरकर यांचे आभार

दै.रायगड नगरी । पनवेल

तळा तालुक्यांतील सौ. प्रभावती चिंचळकर यांच्या डोळ्यांस इजा झाली असता त्यांनी पन-वेल येथील डॉ. सुहास हळदीपूरकर यांच्या लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट या डोळ्यांच्या हॉस्पिटल मध्ये उपचार घेण्यास सुरुवात केली. सदर रुग्णाच्या चिकित्से दरम्यान त्यांच्या डोळ्यांस गंभीर आजार झाला असल्याचे निदान झाल्यानंतर सदर हॉस्पिटल मधील तज्ञ डॉक्टरांनी सदर रुग्णास योग्यते ऑपरेशन व अनुषंगिक उपचार आवश्यक असल्याचे सांगितले. यासर्वाचा एकत्रित एकूण खर्च रुपये ४०,०००/- असा होता. परंतु सदर रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांस एवढा खर्च कोरोना महामारीच्या काळात निव्वळ अशक्य होता. ही बाब त्यांनी शिवसैनिक तथा शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख रमेश म्हात्रे यांस सांगितली.

रमेश म्हात्रे यांनी लागलीच सदर विषयात लक्ष घालून मदत करण्याचे आवाहन, सूचना शिवसैनिक तथा शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे पनवेल तालुका कार्यालय प्रमुख ड.अमर पटवर्धन यांना केली. याकामी ड. अमर पटवर्धन यांनी त्वरित लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट चे सर्वेसर्वा पनवेल मधील प्रथितयश नेत्र चिकित्सा तज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर यांचेशी संपर्क साधून सदर रुग्णाची सध्याची परिस्थिती लक्षात घेता एकूण उपचार खर्चात कपात करण्यासंबंधी आग्रही विनंती केली. शिवसेनेच्या सदरच्या शिष्टाईचा मान राखत डॉ. सुहास हळदीपूरकर यांनी विनंती मान्य केली व मोठ्या मनाने एकूण उपचार खर्च निव्वळ रक्कम रुपये १७,५००/- स्वीकारत आवश्यक ते ऑपरेशन व अन्य सर्व उपचार करून सदर रुग्णास पुन्हा एकदा विनाअडथळा दृष्टी प्राप्त करून दिली. याप्रसंगी रुग्ण सौ. प्रभावती चिंचळकर व त्यांच्या कुटुंबीयांनी योग्य वेळेत आवश्यक ते उपचार रक्कम रुपये २२,५००/- एवढ्या मोठ्या कपातीसह करून मिळाल्याबद्दल शिव-सेना पक्ष-परिवाराचे, शिवसैनिक तथा शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे रायगड जिल्हा प्रमुख रमेश म्हात्रे, शिवसैनिक तथा शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे पनवेल तालुका कार्यालय प्रमुख ड. अमर पटवर्धन, शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष पनवेल उपतालुका प्रमुख राकेश टेमघरे, शिवसेना ग्राहक संरक्षण पनवेल महानगरप्रमुख किरण तावदरे, शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष उपमहानगरप्रमुख अंकुर पाटील तसेच लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट चे सर्वेसर्वा डॉ. सुहास हळदीपूरकर यांचे मनःपूर्वक जाहीर आभार मानले.

कोरोनाच्या बचावासाठी मुस्लीम समाजातर्फे फ्लु क्लिनिक सेंटरचे उद्घाटन

दै.रायगड नगरी । आगरदांडा

जमातुल मुसलमीन मोहल्ला बाजार व मोहल्ला पेठ मुरुड- जंजिरा यांचे संयुक्त विद्यमाने फ्लु क्लिनिक सेंटरचे उद्घाटन रायगड जिल्हा कोविड १९ चे प्रमुख डॉ.विक्रमसिंह पडोळे यांच्या हस्ते फित कापुन मुरूड येथील मुस्लिम समाजगृहातील रौफ शहाबंदर समाज हॉल मध्ये करण्यात आले.

प्रास्ताविक करतांना जंजिरा मेडिकल असोशिएशनचे अध्यक्ष डॉ.मकबुल कोकाटे म्हणाले की, सध्या कोरोनाच्या विकारामुळे सर्वसाधारण रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण असल्याने रूग्ण दवाखान्यात न जाता मेडिसीन खावुन आपला स्वत:चा उपचार करीत आहेत आता रूग्णानी न घाबरता फ्लु क्लिनिक सेंटर मध्ये येवुन आपला उपचार करावा.

या सेंटरमध्ये नाममात्र शुल्क आकारून वैद्यकिय उपचार केले जाणार आहेत. ताप, खोकला, दमा आदी ने पिडीत व्यक्तींनी नि :संकोचपणे तप-ासणी करून घ्यावी. कोविडचे लक्षणे आढळल्यास संशयित रुग्णांना योग्य ती औषध योजना करून गृह विलगीकरण केले जाईल असे सांगितले. सदरील दवाखान्याला कोक्कनी आसोसिएशन व जंजिरा मेडिकल आसोसिएशन मधील सर्व डॉक्टर मदत करणार आहेत. सर्व औषधे मोफत दिली जाणार आहेत. ना नफा ना तोटा तत्त्वर सदरचे क्लीनिक चालवले जाणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

मुस्लीम समाज कार्यकर्ते जहूर कादिरी, अलताब मलिक, अ.रहिम कबले, मुसद्दीक जमादार, अतिक खतीब व दोन्ही जमातीच्या कल्पकतेने सुरू करण्यात आलेल्या या क्लिनिकचा उपयोग सर्व जाती धर्मियांसाठी होणार असल्याबद्दल उपस्थितांनी आनंद व्यक्त केला. या प्रसंगी ग्रामिण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ.विक्रमसिंह पडोळे, मुरूड तहसिलदार गमन गावित, नायब तहसिलदार रविंद्र सानप, मुरूड नगर परिषद नगराध्यक्षा स्नेहा पाटील, उपनगराध्यक्षा नौसिन दरोगे, विरोधी पक्षनेते मंगेश दांडेकर, नगरसेवक प्रमोद भायदे, पी.के.आरेकर, विश्वास चव्हाण, युगा ठाकूर, मेघाली पाटील, प्रांजली मकू, माजी उपनगराध्यक्ष अतिक खतीब, गटविकास अधिकारी संजय चव्हाण, स . पो.नि. रंगराव पवार, विजय सुर्वे, मुसद्दीक कादरी, जंजिरा मेडिकल असो.चे डॉ.मकबूल कोकाटे, डॉ निस्सार बिरवाडकर, डॉ . वसिम पेशइमाम, डॉ.सदफ पेशईमाम, आदी मुस्लीम समाजाचे कार्यकर्ते सामाजिक अंतर राखत मोठया संख्येने उपस्थित होते.

सदरहू क्लिनिक मध्ये ऑक्सिजन सिलेंडर ७, ऑक्सिजन मशीन्स २ तसेच मोफत औषधी पुरवली जाणार असुन कोरोनाच्या महासंकट काळात स्थानिक डॉक्टरांनी सेवाभावी वृत्तीने सहकार्य करणार असल्याची माहिती पेठ मोहल्ला कार्यकर्त्यानी दिली असुन रूग्णांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. एखादा कोरोना बाधित रुग्ण प्राथमिक अवस्थेत असेल व त्याला होम कोरोनटाइल अवस्थेत सिलेंडरची आवश्यकता असल्यास तो मोफत दिला जाणार असल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले.

सावरसई ग्रामपंचायत ठरली पेण तालुक्यातील पहिली आयएसओ मानांकन प्राप्त ग्रामपंचायत

दै.रायगड नगरी । पेण

पेण तालुक्यातील सावरसई ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले असून त्याचा मानांकन सोहळा मा.आ.धैर्यशील पाटील यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्य महादेव दिवेकर हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाला खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष रघुनाथ दळवी, पंचायत समिती सभापती सरीता म्हात्रे,उपसभापती सुनिल गायकर, पंचायत समिती सदस्य निळकंठ दिवेकर, गटविकास अधिकारी चंद्रकांत पाटील, विस्तार अधिकारी प्रसाद म्हात्रे आदींसह सरपंच देवका दरवडा, उपसरपंच ॲड. योगेश दिवेकर, किरण भगत, ग्रामसेविका अर्चना थळे उपस्थित होत्या.

आयएसओ मानांकन मिळा-लेली पेण तालुक्यातील ही पहिली ग्रामपंचायत असून, नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून सावरसई ग्रामपंचायतीने आपली नवीन ओळख निर्माण केली. यावेळी बोलताना माजी आ.धैर्यशील पाटील यांनी, जिल्हा परिषद सदस्य महादेव दिवेकर यांनी ही ग्रामपंचायत विकासाभिमूख करण्यास सुरूवात करत पाया रचला तर आता ॲड. योगेश दिवेकर यांच्यासारखे कार्यकर्ते कळस चढवून पंचायतीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवत आहेत. या पंचायतीचा आदर्श इतर ग्रामपंचायतीने घ्यावा असेही त्यांनी सांगितले.

सुमारे दीड ते दोन हजार दरम्यान लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीत नऊ ग्रामसदस्य आहेत. यामध्ये सरपंच म्हणून देवका दरवडा तर उपसरपंच म्हणून ॲड. योगेश दिवेकर हे काम पाहत आहेत. ॲड.योगेश दिवेकर यांच्या संकल्पनेनुसार विविध उपक्रम ग्रामपंचायत हद्दीत राबविण्यात आले आहेत. यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयात सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. आयएसओ मानांकनासाठी विविध निकष असतात. यामध्ये ग्रामपंचायतीच्या ३३ नमुन्यासह एकूण ५१ निकषांचा समावेश असतो. यामध्ये ग्रामपंचायतीचा अर्थसंकल्प, जन्म-मृत्यू नोंदणी, घरपट्टी वसुली, स्वच्छता, कर्मचारी नेमणूक, मागील तीन वर्षांच्या कर्मचाऱ्यांचे ऑडिट, घनकचरा व्यवस्थापन, विविध उपक्रम आदीसह अनेक निकषांचा समावेश असतो.

आयएसओ मानांकनाचा दर्जा मिळविण्याकरीता सावरसई ग्रामपंचायतने अनेक दिवसांपासून नियोजनबद्ध कामे करून अनेक लोकाभिमुख उपक्रम राबवून आपल्या कामामध्ये सातत्य ठेवले आहे. प्रामाणिकपणे काम करण्याची इच्छाशक्ती असेल तर केलेल्या परिश्रमाला नक्कीच यश प्राप्त होते. हे सावरसई ग्रामपंचायतने दाखविले आहे.मिळालेले यश हे फक्त पदाधिकाऱ्यांचे किंवा सरपंचाचे वैयक्तीक नसून सर्व गावकऱ्यांनी दिलेल्या व प्रशासनाने दाखविलेल्या तत्परतेचे असल्याचे सांगितले आयएसओ ग्रामपंचायत करण्याचा अनुषंगाने उपसरपंच योगेश दिवेकर यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, विशेषत: ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी व ग्रामस्थांनी एकत्रित येवून नियोजन करून प्रत्येकानेच खारीचा वाटा उचलत दिलेल्या योगदनामुळेच ग्रामपंचायतीला हा बहुमान मिळाल्याचे माजी आ.धैर्यशील पाटील यांनी शेवटी सांगितले.

तसेच यावेळी हे मानांकन प्राप्त होण्यासाठी ज्यांनी मेहनत घेतली अशा ग्रामसेविका अर्चना थळे आणि ग्रामपंचायतीचे लेखनिक तथा पेण तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पडवळ यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांचेकडुन पत्रकारांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

दै.रायगड नगरी । तळा

सोमवार (दि.१७ ऑगस्ट)रोजी तळा येथील आढावा बैठकीसाठी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी डॉ.किरण पाटील उपस्थित राहीले असताना तळा पत्रकारांनी आरोग्य विषयक प्रश्न विचारले असता त्यांची सकारात्मक उत्तरे देऊन हे प्रश्न लवचरच मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन पाटील यांनी पत्रकारांना दिले.

तळे तालुक्यातील महागाव प्राथमिक आरोग्य केंद्राची ईमारत दोन वर्षांपूर्वी बांधुन पुर्ण झालेली आहे.या ठिकाणी दीड वर्षापुर्वी १५ पदे शासनाकडुन मंजुर करण्यात आली आहेत.चक्रीवादळानंतर या प्राथमिक आरोग्य केंद्रा वरिल पत्रे उडालेले आहेत.ही सर्व कामे लवकरात पुर्ण करुन हे प्राथमीक आरोग्य केंद्र नजीकच्या काळात नागरिकांसाठी खुले करुन दुर्गम भागातील जनतेला आरोग्य सेवा लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी पत्रकारांनी केली.

त्याचप्रमाणे मांदाड प्राथमिक आरोग्य केंद्र लवकरच पुर्ण करुन तेथेही पद मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा तर मांदाड उपकेंद्रावरिल चक्रीवादळात पत्रे उडाले आहेत तेही बसवुन मिळावेत त्याचबरोबर नव्याने गिरणे उपकेंद्राची मंजुरी मिळालेली आहे ते देखील काम सुरु व्हावे, तळा तालुक्यात पन्हेळी व मजगाव ही दोन उपकेंद्र साई प्राथमिक आरोग्य केंद्राला जोडलेली आहेत ती तळा प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्ग करावी तसेच निगुडशेत उपकेंद्र इंदापुर प्रा.आरोग्य केंद्राकडे आहे ते तळा तालुक्यात यावे. तसेच तळा प्राथमिक प्रा.आ.केंद्र अंतर्गत रोवळे, मांदाड, पीटसई, भानंग व तळेगाव ही पाच उपकेंद्रे असुन याठिकाणी M.P.W.d -.N.M. नाहीत ही सर्व पदे लवकरच भरुन तळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी रिक्त पदे भरावित म्हणजे ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा व्यवस्थित मिळेल.

प्राथमिक आरोग्य केंद्राकडील १०२ आणि १०८ गाड्या नादुरुस्त आहेत त्या सुसळीत करुन द्याव्यांत जेणे करुन रुग्णांना नेणे सोईचे होईल कोवीड-१९ चे तपासणी केंद्र तळे येथे व्हावे अशी मागणी देखील पत्रकारांनी केली. या सर्व समस्या लवकरच पुर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांनी संबंधित अधिकारयांना सुचना केल्या व समस्या लवकरच पुर्ण करण्याच्या दृष्टीने मी प्रयत्नशिल राहीन असे आश्वासन या प्रसंगी मुख्याधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दिले. यावेळी पत्रकार संजय रिकामे, पुरुषोत्तम मुळे, कृष्णा भोसले, संध्या पिंगळे, गटविकासाधिकारी व्ही.व्ही.यादव, नगरसेवक चंद्रकांत रोडे आदि मान्यवर उपस्थित होते.

घरफोडीत २ लाख १७ हजार रूपये किंमतींचे दागिने लंपास

दै.रायगड नगरी । पनवेल

एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत कपाटात ठेवलेले जवळपास २ लाख १७ हजार रूपये किंमतीचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

सुकापूर येथील श्री समर्थ कृपा सोसायटीत राहणारे सुबोध सुरेश पाटील यांचे घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून कपाटात ठेवलेले जवळपास २ लाख १७ हजार रूपये किंमतीचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले आहेत. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

ग्रामीण भागात मासेमारीला आलेत सुगीचे दिवस

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

पावसाळा सुरू झाल्याबरोबर सुरुवातीला पावसाचे पाणी ठिकठिकाणी साठल्यामुळे नदीप्रवाहातून आलेले मासे मारण्यासाठीची एकच लगबग ग्रामीण भागात दिसून येत होती. तर सध्या श्रावण महिन्यात देखील मासेमारीला सुगीचे दिवस आले असल्याचे पहावयास मिळत आहे.

यंदाच्या मोसमी पावसाने बरोबर १ जूनचा मुहूर्त साधत हळूहळू बरबायला सुरुवात केली. तर पुढे बरेच दिवस उलटून गेले तरी मुसळधार स्वरुपात व माश्यांची वल्गन चढेल अशाप्रकारचा समाधानकारक पाऊस न पडल्याने खवय्यांची मात्र निराशाच झाली होती.तर खवय्ये आपली मासे खाण्याची इच्छा भागविण्यासाठी मिळेल ते डबके,नदी,नाले आशा ठिकाणी मिळतील ते मासे पकडून आपली मनाची इच्छा पुर्ण करीत असल्याचे दिसून येत होते.

सध्या श्रावण महिना सुरू असून कधी धो धो पाऊस तर ऊन-पावसाचा खेळ सुरु आहे.

अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील युवा वर्गाला मात्र मासेमारीसाठी सुगीचे दिवस आले असल्याचे दिसून येत आहे. त्यातच कोरोना महामारीमुळे सध्या काही जणाचे कामधंदेही बंद असल्याने एक विरंगुळा तसेच पोटापाण्याची व्यवस्था म्हणून ग्रामीण युवा वर्ग मात्र मासेमारी करताना दिसत आहेत.

बेग कन्स्ट्रक्शन कंपनीने थकीत ३ कोटी रुपये दिले नाहीत ; तर एस. बी. पालरेचा कंपनीचे मालक प्रकाश पालरेचा करणार आत्महत्या

इतर ठेकेदारांनी देखील दिला सामूहिक आत्महत्येचा इशारा

दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी

वाकण–पाली–खोपोली राज्य महामार्ग रुंदीकरणाचे काम बेग कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट कंपनीकडे आहे. या रुंदीकरणासाठीची कामे स्थानिक ठेकेदार, सब ठेकेदारांना बेग कंपनीने दिली आहेत. पालीतील एस. बी. पालरेचा कन्स्ट्रक्शन कंपनीला देखील काम देण्यात आले होते. मात्र या कामाचे तब्बल ३ कोटी रुपये बेग कंपनीने थकविले असल्याने ठेकेदार प्रकाश पालरेचा यांनी ८ दिवसांत कंपनीने थकीत पैसे दिले नाहीत तर आत्महत्येचा इशारा दिला आहे. तसेच पालरेचा यांना पाठींबा देत इतर सर्व ठेकेदारांनी देखील आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला आहे.

सर्व ठेकदारांनी सोमवारी (ता.१७) सायंकाळी कामाचे बाकी असलेले पैसे न

दिल्याने थकबाकी मिळेपर्यंत पर्याय म्हणून अखेर रस्त्याच्या कामासाठी असणाऱ्या यंत्रसामग्री कन्स्ट्रक्शन कंपनीच्या परवानगीने आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. प्रकाश पालरेचा यांनी कंपनीच्या सांगण्यावरून ताबडतोब पाली खोपोली रस्त्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण केले होते. या कामातील तब्बल ३ कोटीची देयके बेग कंपनीकडे थकीत आहेत. एमएसआरडीसी ने बेग कंपनीला पैसे दिले असूनही कंपनी ठेकेदारांचे पैसे देत नाही आहे. त्यामुळे प्रकाश पालरेचा पुरते हवालदिल झाले आहेत. अखेर त्यांनी आत्महत्येचा इशारा कंपनीला दिला आहे. मागील महिन्यात पाली पोलीस स्थानकात त्यांनी पैसे मिळाले नाहीतर जीवाचे बरेवाईट करण्याचा इशारा लेखी पत्राद्वारे दिला आहे असे पालरेचा

> बेग कन्स्ट्रक्शन कंपनीने सर्वच ठेकेदारांचे पैसे थकविले आहेत. त्यामुळे ८ दिवसांत कंपनीने पैसे दिले नाही तर प्रकाश पालरेचा यांच्यासह इतर सर्व ठेकेदार सामूहिक आत्महत्या करतील.
>
> **मनीष खवळे, ठेकेदार, वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्ग**

> बेग कंपनीने पैसे थकविल्याने माझे व इतर ठेकेदारांचे खूप नुकसान झाले आहे. खूप मोठी रक्कम अडकून पडली आहे. मला देखील मटेरिअलचे पैसे, कामगार पगार व इतरांचे पैसे देणे बाकी आहेत. या स्थितीत कंपनी कोणत्याही चर्चेला न बसता फक्त वेळकाढूपणाची भूमिका घेत आहे. त्यामुळे पुढील ८ दिवसांत थकीत देयके दिली नाही तर मी माझ्या जीवाचे बरेवाईट करून घेईन.
>
> **प्रकाश पालरेचा, ठेकेदार**

यांनी सांगितले. या सर्व प्रकरणाबाबत बेग कन्स्ट्रक्शन कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर राकेश खुल्लर यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

मराठी मंडळाने संकटकाळातील नागरिकांचे वीज बिल माफ करावे, अन्यथा शेकाप जनआंदोलन करणार : रमेश मोरे

दै.रायगड नगरी । माणगाव

कोरोना महामारी यामुळे करण्यात आलेले लॉकडाऊन तसेच ३ जून २०२० रोजी झालेले निसर्ग चक्रीवादळ याचा मोठा तडाखा कोकणाला बसला असून माणगाव तालुक्यातही नागरिक पुरते संकटात ओढले गेले असून याचा विचार महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने करून नागरिकांची वीज बिले माफ करावीत अन्यथा शेकापतर्फे वीज मंडळावर हजारो नागरिकांचा मोर्चा आणून आंदोलन छेडण्यात येईल असा गर्भित इशारा माणगाव तालुका शेकापचे चिटणीस रमेश मोरे यांनी दिला आहे.

याबाबतचे निवेदन बुधवार दि.१९ ऑगस्ट २०२० रोजी पक्षाचे ज्येष्ठ नेते अस्लम राऊत, राजिपचे माजी समाजकल्याण सभापती अशोक गायकवाड, तालुका चिटणीस रमेश मोरे, माणगाव तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाचे सभापती निलेश थोरे, खरवली ग्रामपंचायतीचे उपसरपंच स्वप्नील सकपाळ, तालुका शेकाप सहचिटणीस राजेश कासारे, कृउबा समिती संचालक हसनमिया बंदरकर, सुरव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य मधुकर अर्बन, देगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिनेश गुगले, मोर्बा ग्रामपंचायत माजी सरपंच विलास गोठल, खरवली माजी सरपंच नथुराम आडीत, बळीराम खडतर, सुरेश अर्बन, विलास मोरे, रमेश बक्कम, गोविंद पवार यांनी माणगाव तहसीलदार श्रीमती प्रियंका आयरे कांबळे यांना देवून आमचे हे निवेदन सरकार दरबारी पोहचवावे असे रमेश मोरे यांनी सांगितले. तसेच या निवेदनाची प्रत मराठी मंडळाचे माणगाव उपविभाग अभियंता यांना माणगाव कार्यालयात जाऊन देण्यात आले आहे.

कोरोना महामारीच्या काळात मार्च २०२० पासून ते जवळपास तीन महिने व आजपर्यंत लॉकडाऊन सुरूच आहे. लॉकडाऊन काळात बहुसंख्य लोकांच्या हाताला काम धंदा राहिलेला नाही. त्यातच ३ जून २०२० रोजी झालेल्या निसर्ग चक्री वादळाने जवळपास फटका सर्वांनाच दिला आहे. या संकटातून अनेक नागरिक अजूनही सावरलेले नाहीत. काहींवर आताही उपासमारीची पाळी आलेली आहे.घरे सुधारण्यासाठी नागरिक डोक्याला हात देऊन बसले आहेत. अशा भयाण परिस्थितीत नागरिकांना जिणे मुश्किल झाले आहे.अशा परिस्थितीत ग्राहकांना वीज बिल माफ करण्यात यावे. लॉकडाऊनमुळे दिलेल्या अवाजवी बिलांमधील वीज आकार, इंधन समायोजन आकार,वीज शुल्क,विजविक्री कर आणि व्याज माफ करण्यात यावे. तसेच कोणतीही मिटर लाईन व वीज पुरवठा खंडित करू नये. वारंवार खंडित होत असलेल्या वीज पुरवठ्याबाबत लक्ष देवून ग्राहकांच्या समस्यांचे तातडीने निवारण करण्यात यावे असे शेकापतर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. या सर्व गोष्टींचा महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने सहानुभूतीपूर्वक विचार करून नागरिकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही याची खबरदारी घ्यावी अन्यथा आंदोलनास सामोरे जावे असा इशारा माणगाव तालुका शेकापतर्फे देण्यात आला आहे.

भाड्याच्या चार कार परस्पर विकण्याचा प्रयत्न करणाऱ्या दुक्कलीचा शोध सुरु

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल भागात रहाणाऱ्या दोघा भामटयानी एका टुर्स ऍन्ड ट्रव्हल्स चालकाकडून भाडेतत्वावर चार कार चालविण्याच्या बहाण्याने घेऊन सदर कारची परस्पर विक्री करण्याचा प्रयत्न केल्याचे उघडकीस आले आहे. मितेश भानुशाली व शैलेश दाभाणे अशी या दोघा भामटयाची नावे असून खारघर पोलिसांनी त्यांच्यावर फसवणूकिचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील आरोपी मितेश भानुशाली व शैलेश दाभाणे या दोघांनी पंधरा दिवसापुर्वी ओएलएक्सवर मासिक हफ्त्यावर गाडी चालविण्यासाठी पाहिजे असल्याबाबतची जाहिरात टाकली होती. सदरची जाहिरात वाशी परिसरात रहाणारे अनिलकुमार शुक्ला यांनी पाहिल्यानंतर त्यांनी शैलेश दाभाणे याला संपर्क साधला होता. त्यावेळी शैलेशने ७ सिटर गाडया पाहिजे असल्याचे सांगितल्यानंतर शुक्ला यांनी त्याला मारुती इर्टीगा कार देण्याचे कबुल केले होते. त्यानंतर शुक्ला सदर व्यवहाराची बोलणी करण्यासाठी मितेश भानुषाली रहात असलेल्या पनवेल मधील इंडिया बुल्स येथे गेला असताना भानुषाली व दाभाणे या दोघांनी त्यांच्या गाड्या पनवेलच्या एमएसईबी कार्यालयात व टि.सी.एस ठाणे या कार्यालयात चालविणार असल्याचे शुक्ला याला सांगितले होते. तसेच प्रत्येक महिन्याला २५ हजार रुपये भाडे व ६ हजार किमीच्यावर गाडी चालल्यास ९ रुपये प्रती किलोमीटर प्रमाणे भाडे देण्याचे आश्वासन दिले होते.

त्यानंतर भानुशाली याने शुक्ला सोबत इर्टीगा कार भाडेतत्वावर देण्याचा करार केल्यानंतर शुक्ला यांनी आपल्या ओळखीतील आर.एन.टुर्स ऍन्ट ट्रॅव्हल्सचे कृष्णा बेहरा यांच्याकडून तीन इर्टीगा कार भाडेतत्वावर घेऊन त्या भानुशाली याच्या ताब्यात दिल्या होत्या. या तीन्ही इर्टीगा कारचे प्रत्येकी २५ हजार रुपये प्रमाणे आगाऊ भाडे भानुशाली याने दिल्याने शुक्ला याचा त्याच्यावर विश्वास बसला होता. त्यांनतर दुसर्याच दिवशी भानुशाली याने अकोला येथे वैयक्तिक कामाकरिता जाण्याचा बहाणा करुन शुक्ला यांच्याकडून त्यांची कार भाडेत्वावर घेऊन पलायन केले. यादरम्यान, शुक्ला यांनी भानुशाली याला संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने शुक्ला यांचे फोन घेतले नाहीत. मात्र रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास मालेगाव ट्रॅफिक पोलिसांनी त्यांची कार ओव्हर स्पिड असल्याने त्यांना १ हजार रुपये दंडाचे चलन मोबाईलवर पाठवून दिले. यादरम्यान, भानुशाली याने शुक्ला यांच्याकडून भाडेतत्वावर घेतलेल्या कृष्णा बेहरा यांच्या इर्टीगा कारची विक्री करण्यासाठी त्याचे फोटो व्हॉट्सऍपवर टाकल्याची माहिती कृष्णा बेहरा यांना मिळाली. त्यानंतर शुक्ला यांनी भानुशाली याला संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्याचा फोन बंद असल्याचे आढळुन आले. तसेच शैलेश दाभाणे हा देखील त्यांच्या कारबाबत माहिती देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे आढळुन आले. त्यामुळे शुक्ला यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

उरणमध्ये कोरोनाचे १५ नवे रुग्ण तर तिघांचा मृत्यू

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यात कोरोनाने कहर केला असून, रुग्णांच्या संख्येत अधिक प्रमाणात वाढ होतांना दिसत आहे.काल १५ नव्या कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली असून, तीन रुग्णांचा उपचार घेत असतांना मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.तर १६ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत.

यामध्ये तालुक्यातील जेएनपीटी – १, कोप्रोली – १, उरण – २, चिर्ले – २, करंजा, सातघर – १, मोठीजुई –१,आवरे –१, गोवठणे – १, वेश्वि – १, भेंडखळ – ३ व म्हातवली – १, असे १५ कोरोना बाधित रुग्ण आढळून आले आहेत. उरण –१, सोनारी – १ व मोरा –१ अशा ३ रुग्णांचा उपचार घेत असतांना मृत्यू झाला आहे. तर टाकीगाव – १,जासई – ४,उरण – ३, करंजा – २, डोंगरी – १, विंधणे –१, जेएनपीटी –२, वेश्वि – १ व रांजणपाडा – १असे १६ कोरोना बाधित रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत तालुक्यातील २ हजार २६२ नागरिकांची कोरोना चाचणी करण्यात आली आहे. त्यातील १ हजार १८० रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. त्यापैकी ९३६ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. तालुक्यातील ५४ रुग्णांचा कोरोना संसर्गाच्या प्रादुर्भावाने मृत्यू झाला असून, विद्यमान कोरोना बाधित १९० रुग्ण बोकडविरा व जेएनपीटी येथील कोविड सेंटर येथे उपचार घेत आहेत.

उरण तालुक्यातील ग्रामीण भागात पिठोरीची परंपरा कायम

दै.रायगड नगरी । उरण

श्रावण सुरू होताच ग्रामीण भागातील कष्टकरी जनता आपले सण साजरे करण्यास प्राधान्य देत आहे. यामध्ये पिठोरी आमवस्येला पिठोरीची पूजा गावागावातील अनेक घरात केली जाते.पिरोरी पूजन हे व्रत असल्याने हे दरवर्षी नित्यनियमाने करण्यास प्राधान्य दिले जाते.

श्रावणातील नागपंचमी, मंगळागौरी, यांच्या प्रमाणेच श्रावण आमवस्येला पिठोरी आमावस्या म्हणून त्या दिवशी पिठोरीची पूजा केली जाते. घरावरील संकटे दूर होऊन आपल्या परिवाराला सुख समृद्धि लाभावी म्हणून देवीची भक्ती भावनेने पूजा केली जाते. लव्हाले, तेरड्याची झाडे, नागवेल यांची पत्री आणून श्रावण आमवस्येच्या दिवशी संध्याकाळी सूर्यास्तानंतर घरातील पाटावर त्याची आरास करून देविची भक्ती भावाने मनोभावें पूजा केली जाते.

यावेळी आप्त स्वकीयाना पूजन सोहळ्यासाठी आग्रहाचे निमंत्रण दिले जाते. पुजनानंतर महाप्रसाद करून मध्यरात्री पर्यंत पिठोरी देवीचा जागर केला जातो. आणि मध्यरात्री नंतर पूजन केलेल्या पत्रीचे शेतकरी आपल्या शेतामध्ये किंवा तलावात विसर्जन केले जाते.

ग्रामीण भागातील ही पूर्वांपर चालत आलेली प्रथा ही आजतागायत मोठ्या उत्साहात व भक्ती भावनेने पाळली जाते. उरणच्या पूर्व भागात पिठोरी आमावस्या सोहळा मोठ्या उत्साहात सम्पन्न होत असल्याने काल जनतेच्या उत्साहात उधाण आले होते.

भगवे वादळ मित्र मंडळ २०२० श्री.गणेश चतुर्थी निमित्ताने आरती संग्रहाचे प्रकाशन

दै.रायगड नगरी । पनवेल

सालाबादाप्रमाणे यंदाही खारघर येथील भगवे वादळ मित्र मंडळातर्फे श्री गणेश चतुर्थी निमित्ताने आरती संग्रह २०२० चे प्रकाशन शिवसेना पदाधिकाऱ्यांसह महाआघाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी आरतीसंग्रहाचे प्रकाशन रायगड शिवसेना जिल्हा प्रमुख शिरीष घरत, रायगड जिल्हा सलागार बबनदादा पाटील, काँग्रेस रायगड जिल्हा पदाधीकारी सुदामशेठ पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस उरण तालुका अध्यक्ष प्रशांत पाटील, खारघर शाखाप्रमुख सचिन ठाकूर आदींच्या उपस्थितीत आयोजक पनवेल शिवसेना उपमहानगर संघटक गुरुनाथ लिलाधर पाटील यांनी केले.

सर्व उपस्थितांनी आरती संग्रहाचे कौतुक करून कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावावर सर्वांनी घरीच राहून गणरायाची पूजाआर्चा करावी असे आवाहन केले आहे.

स्वदेस फाऊंडेशनतर्फे आर्थिक मदतीचा हात

दै.रायगड नगरी । म्हसळा

जिल्ह्यातील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर आणि सुधागड या तालुक्यांमध्ये गावांमधून मुंबईला स्थायिक झालेले व गावाला परत येण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांसाठी स्वदेस फाऊंडेशनतर्फे रिव्हर्स मायग्रेशन ही स्कीम सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती स्वदेसचे प्रकल्प महाव्यवस्थापक तुषार इनामदार यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस दिली.

महात्मा गांधी यांनी खेडयाकडे चला अशी हाक देऊन देशाच्या सर्वांगिण विकासाचा संदेश दिला असताना गेल्या अनेक वर्षांपासून कोकणात मात्र विरोधाभास दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या तीन वर्षांपासून स्वदेस फाऊंडेशनमार्फत शहराकडून गावाकडे स्थलांतर करणाऱ्यांसाठी गावाकडेच रोजगारनिर्मितीचे प्रयत्न केले गेले आहेत. याअंतर्गत आतापर्यंत १२५ हून अधिक ग्रामस्थांनी आपल्या कुटुंबासह मुंबईहून गावाला परत येऊन वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग सुरू केले आहेत. स्वदेस फाउंडेशन काम करीत असलेल्या माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर आणि सुधागड या सात तालुक्यातील १८ ते ४५ या वयोगटातील ग्रामस्थ मुंबई–पुणे व इतर शहरामधून लॉकडाऊन दरम्यान गावाला आले आहेत व पुन्हा पुणे–मुंबई शहरांमध्ये परत जाण्याऐवजी गावातच स्वतःचा उद्योग–व्यवसाय करू इच्छितात, अशांनी स्वदेस फाउंडेशन व्यवस्थापक संतोष जाधव– ९८९१६१२२९८, राजेंद्र होनमाने ९१८६५२३२०५२३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी स्वदेसचे प्रकल्प महाव्यवस्थापक तुषार इनामदार यांनी सांगितले आहे.

गणेशोत्सवापूर्वी माणगावमधील वादळग्रस्तांना नुकसान भरपाई मिळावी : संजयआप्पा ढवळे

दै.रायगड नगरी । माणगाव

गणेशोत्सव हा हिंदू बांधवांचा इतर काही सणांपैकी एक मोठा सण मानला जातो.हा गणेशोत्सव साजरा करण्यासाठी दरवर्षी मुंबई येथून मोठ्या संख्येने चाकरमानी आपल्या गावी कोकणात येत असतात.गणेशाचे आगमन घरोघरी शनिवार दि.२२ ऑगस्ट २०२० रोजी होणार असून या गणेशोत्सवापूर्वी माणगाव तालुक्यातील हजारो वादळग्रस्त माणगावमधील सर्व वादळग्रस्तांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी माणगाव तालुका भाजपचे अध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात संजयआप्पा ढवळे यांनी पुढे असे म्हटले आहे की,निसर्ग चक्रीवादळ होऊन अडीच महिने होऊन गेले तरी माणगाव तालुक्यातील हजारो वादळग्रस्त अजूनही नुकसान भरपाईपासून वंचित आहेत.वादळग्रस्त नागरिक तहसील कार्यालयातून तसेच बँकातून आपल्या नुकसान भरपाईसाठी फेऱ्या मारीत आहेत. तहसीलमधून वादळग्रस्तांची नावे तसेच बँक खाते नंबर चुकविण्यात आल्याने मदत वाटपात पूर्णपणे गोंधळ उडाला आहे. यामुळे वादळग्रस्त संतप्त झाले आहेत. या सर्व वादळग्रस्तांना शासनाच्या निकषाप्रमाणे झालेल्या पंचनाम्यानुसार सरसकट मदत गणेशोत्सवापूर्वी मिळावी अशी आपली मागणी असल्याचे संजयआप्पा ढवळे यांनी सांगितले आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोंडगाव ग्रामपंचायतीची थर्मल स्क्रिनींग मोहिम

दै.रायगड नगरी । वाकण

कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी रोहा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांची ऑक्सीमीटर व थर्मल स्क्रीनींग तपासणी करण्यासंदर्भात रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी १७ ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कीरण पाटील यांनी त्वरित नागरिकांची आरोग्य तपासणी करण्या संदर्भात रोहा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना व त्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना सुचना केल्या आहेत.

त्यानुसारच रोहा पंचायत समिती मधील पाणीपुरवठा विभागाचे कनिष्ठ अभियंता व कोरोना विषाणू सर्वेक्षण पथक प्रमुख संतोष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठण्याजवळील कोंडगाव (ता. रोहा) ग्रामपंचायतीमध्ये नागरिकांची ऑक्सीमीटर व थर्मल स्क्रीनींग तपासणी मोहिम राबविण्यात आली.

कोडंगाव ग्रामपंचायतीचे सरपंच निखील बाळाराम मढवी, माजी सरपंच अनंत वाघ, गोविंद हंबीर, मधुकर मढवी, निर्मला मढवी, सोनल वाघ, ग्रामसेवीका विद्या घरत व शिक्षक उपस्थित होते. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोंडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात आलेली ही ऑक्सीमीटर व थर्मल स्क्रीनींग तपासणी मोहीम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका, प्राथमिक शाळेतील शिक्षक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांनी मोलाचे सहकार्य केले.